# कोरोना महामारी आणि शेती व शेतकरी वर्गासमोरील समस्यांचा अभ्यास.

**प्रा.डॉ.दत्तात्रय सौदागर सावंत,** राज्यशास्त्र विभाग, वेणूताई चव्हाण कॉलेज, कराड.

**प्रस्तावना** –

कोरोना महामारीमुळे आज संपूर्ण जग विस्कळीत झाले आहे. व्यक्ती व समाजाची जीवन जगण्याची पध्दत बदलली आहे. व्यक्ती व समाजाच्या मानसिकतेत काही अंशकालीन तर काही दिर्घकालीन बदल होताना दिसत आहेत. व्यक्ती व समाजकारणाबरोबर शेती, शेतकरी, राजकारण, अर्थकारण, प्रशासन या सर्वच क्षेत्रांवर कोरोना महामारीचे विविध परिणाम होवून नवीन आव्हाने उभी राहत आहेत. प्रामुख्याने शेती व शेतकरी वर्गासमोर आज प्रचंड आव्हाने उभी राहिली आहेत. परिणामी ग्रामीण जीवन व कृषी अर्थव्यवस्थेत आमूलाग्र बदल घडून येत आहेत. त्यातून जागतिक अर्थव्यवस्था धोक्यात येताना दिसत आहे. त्याला भारतही अपवाद नाही. भारतात आज ६५ टक्के लोक शेती व शेतीआधारित उदयोगावर अवलंबून आहेत. शेती व शेतकरी वर्गासमोर आधिच अपुरा पाणीपुरवठा, वीजेचे विविध प्रश्न, अल्पउत्पादकता, हमी भावाचा प्रश्न, वाढता औषधांचा खर्च व मजूरांच्या समस्या असताना कोरोना महामारीमूळे त्यात आणखी विविध समस्यांची भर पडली आहे. कोरोना महामारीच्या काळात पंढरपूर तालुक्यातील शेती व शेतकरी वर्गासमोर जे विविध प्रश्न उभारले आहेत. त्यांचा अभ्यास करण्यासाठी प्रस्तुत शोधनिबंधाची मांडणी केली आहे.

**उद्देश** –

प्रस्तुत शोधनिबंधासाठी पुढील उद्देश ठेवले होते.

१. कोरोना महामारीमुळे शेती व शेतकरी वर्गासमोर निर्माण झालेल्या समस्यांचा अभ्यास करणे.
२. कोरोना महामारीमुळे आलेल्या समस्यांचा शेतकरी वर्गाने कश्या पध्दतीने सामना केला ? याचा अभ्यास करणे.
३. कोरोना महामारीच्या काळात सरकारकडून शेतकरी वर्गास कोणकोणत्या प्रकारची मदत मिळाली, हे अभ्यासणे.

**संशोधन पध्दती** –

प्रस्तुत शोधनिबंधासाठी क्षेत्रीय संशोधन पध्दतीचा वापर केला आहे. तसेच माहितीचे संकलन करण्यासाठी प्रश्नावली या प्राथमिक साधनाचा वापर केला होता. माहिती संकलन करताना पंढरपूर तालुक्यातील एकुण ४० शेतकरी नमुना म्हणून निवडले होते. त्यांचे वर्गीकरण पुढीलप्रमाणे केले होते. अल्प भूधारक शेतकरी – २०, फळबागा असणारे शेतकरी – १०, भाजीपाला व ईतर पिके घेतलेले शेतकरी – १०, मोठे शेतकरी – २० फळबागा असणारे शेतकरी – १०,भाजीपाला व ईतर पिके घेतलेले शेतकरी – १०

**माहितीचे वर्गीकरण** –

प्रस्तुत शोधनिबंधासाठी क्षेत्रीय संशोधन पध्दतीचा वापर करून प्रश्नावलीच्या आधारे संकलित केलेल्या माहितीचे वर्गीकरण व विश्लेषण पुढील प्रमाणे केले आहे.

कोरोना महामारीमुळे शेतकरी वर्गासमोर उभारलेल्या समस्या – प्रस्तुत शोधनिबंधासाठी माहितीचे संकलन केल्यानंतर त्यातून डाळींब, पेरू, द्राक्षे, आंबा, बोर, चिक्कू ईत्यादी फळबागांचे उत्पादन करणारे आणि पालेभाज्या, नगदी पिकांचे उत्पादन करणाऱ्या शेतकरी वर्गासमोर कोरोना महामारीमूळे पुढील समस्या उभारल्या आहेत.

१. फळबागांसाठी आवश्यक असणारी किटकनाशके, औषधे शेतकऱ्यांना फवारणीसाठी वेळेवर मिळाली नाहित. जेव्हा ती मिळाली, तेव्हा त्यांच्या किंमतीत वाढ झाली होती.
२. फळबागांना उशिरा फवारणी केल्याने फळबागा रोगांस बळी पडल्या.
३. आवश्यक त्या वेळेत शेतमजूर उपलब्ध झाले नाहीत.
४. एप्रिल व मे महिण्यामध्ये फळ मार्केट बंद असल्यामुळे जो माल विक्रीसाठी तयार होता, तो न विकला गेल्याने आर्थिक नुकसान झाले.


५. जून महिण्यामध्ये फळ मार्केट सुरू झाले. परंतु व्यापारी वर्गाने कोरोना महामारीची कारणे सांगून कमी दराने फळपिकांची खरेदी केली.
६. द्राक्षे, आंबा, पेरू, चिक्कू ही फळे जास्त काळ न टिकणारी असल्याने ती शेतातच नासून गेली.
७. शेती हे उत्पादनाचे एकमेव साधन असलेल्या शेतकऱ्यांचे प्रचंड आर्थिक नुकसान झाले.
८. ज्या शेतकऱ्यानी एप्रिल, मे महिण्यामध्ये फळबागा उत्पादनासाठी तयार केल्या होत्या, त्या बागा कोलमडल्याने शेतकऱ्यांचे पुढील आर्थिक वर्षाचे नियोजन ढासळले.

अशा विविध समस्या आज कोरोना महामारीमुळे शेती व शेतकरी वर्गासमोर उभारल्या आहेत.

**माहितीचे विश्लेषण –**


प्रस्तुत शोधनिबंधासाठी संकलित केलेल्या माहितीचे विश्लेषण पुढील प्रमाणे केले आहे.

आलेख क्र. १ कोरोना महामारी काळातील शेतकऱ्यांच्या समस्या.




उपरोक्त आलेखामध्ये कोरोना महामारीकाळात कोरोनामुळे शेती व शेतकरी वर्गापुढे निर्माण झालेल्या समस्यांचे वर्गीकरण केले आहे. निळया रंगातील आलेख त्याखाली दिलेली समस्या उपस्थित केलेल्या फळबागांचे उत्पादन करणाऱ्या शेतकऱ्यांची संख्या दर्शवित आहे तर तपकिरी रंगातील रंगातील आलेख त्याखाली दिलेली समस्या उपस्थित केलेल्या फळबागांचे उत्पादन करणाऱ्या शेतकऱ्यांची संख्या दर्शवित आहे

आलेख क्र. २ कोरोना महामारीकाळातील शेतकऱ्यांच्या प्रश्नांची टक्केवारी.



उपरोक्त आलेखामध्ये कोरोना महामारी काळात कोरोनामुळे शेतकरी वर्गासमोर उभारलेल्या प्रश्नांची, समस्यांची तिव्रता, टक्केवारी दिली आहे. वरील आलेखावरून असे दिसते की, खरेदी—विक्री (मार्केट) व्यवस्था बंद असल्याने आर्थिक नुकसान झाले असे म्हणणाऱ्या शेतकऱ्याची संख्या सर्वाधिक म्हणजे ९५ टक्के आहे. त्याखालोखाल शेतकऱ्यांना कोरोना महामारीमुळे भेडसावणारी महत्वाची समस्या म्हणजे किटकनाशके, औषधे जादा दराने विकत घ्यावी लागली. असे म्हणनाऱ्या शेतकऱ्यांची संख्या ९० टक्के आहे. तर त्याखालोखाल ८५ टक्के शेतकऱ्यांचे शेती हे एकमेव साधन असल्याने आणि ती तोटयात गेल्याने आर्थिक नुकसान झाले असे म्हणणे आहे. तर नवीन लागवड धोक्यात आली असे म्हणणाऱ्या शेतकऱ्यांचे प्रमाण ५० टक्के आहे. तर व्यापारी वर्गाने शेतमालाची कमी दराने खरेदी केली, असे म्हणणाऱ्या शेतकऱ्यांचे प्रमाण ४५ टक्के आहे. सर्वात कमी म्हणजे ३५ टक्के शेतकऱ्यांच्या मते, मागणी नसल्याने शेतीमाल शेतात खराब होवून गेला. परिणामी आर्थिक तोटा सहन करावा लागला आहे. थोडक्यात याना त्या कारणाने शेतकरी वर्गाचे आर्थिक नुकसान झाले आहे. यावर शेतकरी वर्गास आर्थिक मदत म्हणून केंद्र व राज्य सरकारकडून विविध प्रकारची मदत करण्यात आली. परंतु शेतकऱ्यांच्या मते ती रक्कम तोकडी असून त्यातून आर्थिक तोटा भरून निघणार नाही.

**निष्कर्ष** —

उपरोक्त विवेचनावरून पुढील निष्कर्ष समोर येतात.

१. कोरोना महामारीमुळे शेतकरी वर्गाचे आर्थिक नुकसान झाले आहे.
२. शेतीमाल खरेदी विक्री व्यवस्था बंद असल्याने सर्वाधिक शेतकऱ्यांचे नुकसान झाले आहे.
३. किटकनाशके व औषधे शेतकऱ्यांना नेहमीपेक्षा वाढीव किंमतीने घ्यावी लागली, तसेच ती वेळेवर मिळाली नाहीत.
४. नाशवंत शेतीमालाचे नुकसान होवून शेतकऱ्यांचा आथिक तोटा झाला.
५. शेतीमाल शेतात खराब होण्याचे प्रमाण ५० टक्के दिसून आले.
६. शेती हा एकमेव उत्पादनाचे साधन असून तीच तोटयात आल्याने शेतकरी वर्गासमोर उपासमारीची वेळ आली.

**उपाययोजना** —

वरील विवेचनावरून असे दिसते की, एकुणच शेती व शेतकरी वर्ग अडचणी आला आहे. त्याला या समस्यांच्या गर्तेतून बाहेर काढण्यासाठी विविध उपाययोजना करणे आवश्यक ठरते. त्या उपाययोजनांची मांडणी पुढीलप्रमाणे केली आहे.

१. सामाजिक अंतर पाळून कृषी उत्पन्न बाजार समित्या सुरू कराव्यात.
२. शेतीमालाचे हमी भावा ठरवून दयावेत.
३. फळबागांचे आर्थिक नुकसान पाहून खर्चाच्या प्रमाणात आर्थिक मदत मिळावी.
४. शेतीसाठी बिगर व्याजाने कर्जपुरवठा करावा.
५. शेती हे एकमेव साधन असणाऱ्या शेतकऱ्यांना वेगळी मदत करून त्यांना उभा करावे.

**संदर्भग्रंथ सूची** —

१. प्रश्नावली — पंढरपूर तालुक्यातील ४० शेतकरी.
२. जोशी शरद, शेतीचे अर्थकारण व राजकारण, शेतकरी संघटना प्रकाशन, अलिबाग.
३. बोरसे शिवनाथ, शेतकऱ्यांच्या समस्या — शोध आणि बोध, वसुधा प्रकाशन, नाशिक.